# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/खर्च मर्यादा./जि/ता.स.नि.अ./अभि.धा./३८४४/२०१९ दिनांक : १५/०३/२०१९ १५/४/१८

## -: परिपत्रक :-

**विषय :- सहकारी संस्थांच्या निवडणूकांच्या निवडणूक निधीबाबत...**

संदर्भ :- १. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/अभि.धा-३८/निवडणूकनिधी/४०९१/सन १६, दि.५.७.१६

२.प्राधिकरणाकडील पत्र जा.क्र.रासनिप्रा/नि.ख.वि.मर्या/मार्ग.सुचना/६७७५/२०१६, दिनांक १६.११.१६

३. प्राधिकरणाचे शुध्दीपत्रक जा.क्र.रासनिप्रा/नि.ख.वि.मर्या/मार्ग.सुचना/शुध्दीपत्रक/१०४५/२०१८, दिनांक १२.२.१८

४. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/खर्च मर्यादा/जि/ता.स.नि.अ./१९०४/२०१८, दिनांक १६.०३.१८

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१३) मधील तरतुदीनुसार "निवडणूक निधी" मधून निवडणूकीसाठी लागणारा सर्व खर्च करण्याची तरतूद आहे. सदर तरतुदीस अनुसरुन प्राधिकरणाने जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचे स्तरावर राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या नावाने बँक खाते उघडून सदर खात्यात संस्थेने निवडणूक निधी जमा करावयाचे व त्या निधीतून जिल्हा /तालुका सहकारी निवडणूक अधिका-याने निवडणूक निर्णय अधिका-यास निवडणूक खर्चासाठी निधी देण्याचे आदेश संदर्भीय आदेश/परिपत्रकाद्वारे निर्गमित केले आहे.

सदर आदेशाद्वारे संस्थेने निवडणूकीकरीता लागणारा सर्व निधी उपरोक्त नमुद निवडणूक निधीच्या खात्यात धनादेश/धनाकर्षाद्वारे जमा करण्याच्या आणि अशा जमा निधीमधून आवश्यकतेनुसार जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिका-याने निवडणूक निर्णय अधिका-यास धनादेशाद्वारे निधी उपलब्ध करुन देण्याच्या स्पष्ट सूचना यापुर्वीच निर्गमित करण्यात आल्या आहेत.

तसेच सहकारी संस्थांच्या निवडणूका पार पाडताना निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कोणत्याही परिस्थितीत संस्थेकडून परस्पर निवडणूक निधी प्राप्त करुन घेऊ नये तसेच निवडणूकीसंबंधी कोणताही खर्च परस्पर करणेबाबत संस्थेस सूचित करु नये. अशा स्पष्ट सूचना संदर्भीय आदेशान्वये दिल्या असून सदरची बाब निदर्शनास आल्यास गंभीर शिस्तभंगाची कृती मानून त्याबाबत कार्यवाहीचा प्रस्ताव संबंधितांकडे पाठविण्यात येईल असे निर्देश संदर्भीय आदेश क्र. १ अन्वये देण्यात आले आहेत.

मात्र प्राधिकरणाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संस्थेकडून परस्पर निधी प्राप्त करुन घेतला आहे तसेच निवडणूकीसंबंधी खर्च परस्पर करणेबाबत संस्थेस सूचित केले आहे. सदरची कृती ही गंभीर आहे व प्राधिकरणाच्या परिपत्रक/आदेशांची उल्लंघन करणारी आहे. यास्तव अशा प्रकारे उचल केलेला निधी व संस्थेने परस्पर केलेला खर्च हा निवडणूक खर्च अंतिम करतेवेळी जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी

यांचेकडून विचारात घेतले जात नाही. त्यामुळे अंतिम निवडणूक खर्च मंजूरी आदेशामध्ये त्रृटी निर्माण होतात. सबब, अशा प्रकारच्या त्रृटी टाळण्याकरीता एकूण उपलब्ध निवडणूक निधी यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश करावा.

१. संस्थेने निवडणूक प्रयोजनार्थ जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचे बँक खातेमध्ये जमा केलेला निधी

२. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संस्थेकडून परस्पर निधी उचल केली असल्यास ती रक्कम.

३. निवडणूक प्रयोजनार्थ संस्थेने परस्पर केलेला खर्च (तपशिलासह)

४. निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे नामनिर्देशन पत्र, उमेदवार अनामत व मतदार यादी विक्रीतून जमा झालेला निधी.

निवडणूक खर्च मंजूरीसाठी प्राप्त होणा-या प्रस्तावासोबत अ.क्र. १ ते ३ ची माहिती संस्थेकडून लेखी स्वरुपात उपलब्ध करुन घेऊनच निवडणूक खर्च अंतिम करण्यात यावेत. उपरोक्त माहिती अभावी खर्च अंतिम केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी व निवडणूक कक्षाची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महा.रा.पुणे यांच्या आदेशानुसार.**

१२।७।१९

**(यशवंत गिरी)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
३. निवडणूक निर्णय अधिकारी (सर्व)